# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१३** **विषय क्रमांक - १३**
दिनांक : १६/०२/२०२४ विभाग : रक्तपेढी विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - १३<br>दिनांक<br>१६/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागाकडील रक्त पिशव्याचे दर निश्चित करणे बाबत... |
| ठराव क्रमांक - १३<br>दिनांक<br>१६/०२/२०२४ | वरिल विषयांकीत अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे रक्तपेढी विभागाकडील रक्तपिशव्यांचे दर राष्ट्रीय रक्तसंक्रमण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना नुसार तसेच जिल्हा रुग्णालय रक्त केंद्र अहमदनगर यांच्या दरसुचीनुसार आकारणी होत आहे. रक्तपेढी विभागाच्या प्रस्तावातील दर पाहता शहरातील व ग्रामीण भागातील गोरगरीब नागरिकांना सुविधा मिळावी याकरीता जिल्हा रुग्णालय यांच्या दरापेक्षा ५०% कमी दर निश्चितीस स्थायी समितीने मा.प्रशासक ठराव क्रमांक १७ दिनांक ०८/०१/२०२४ अन्वये मान्यता व मा.प्रशासक यांची शिफारस करण्यांत आली आहे.<br><br>**अ.क्रं.** \| **रक्तघटक Description** \| **सुधारीत सेवा शुल्क**<br>१ \| Whole Blood \| Rs.550 Per Unit<br>२ \| Packed Red Cells \| Rs.550 Per Unit<br>३ \| Fresh Frozen Plasma \| Rs.150 Per Unit<br>४ \| Plarelet Concentrate \| Rs.450 Per Unit<br>५ \| Single Donor Platelet (SDP) (ॲफरेसिस) \| Rs.4500 Per Unit<br>६ \| Cryoprecipitate \| Rs.100 Per Unit<br><br>तसेच १) थॅलेसिमिया, हिमोफेलिया,ॲनेमिया व इतर रक्ताशी निगडीत आजार (ज्या आजाराने रुग्णास जीवीत राहण्यासाठी वारंवार रक्त संक्रमण करावे लागते, अशा आजाराने बाधित रुग्ण) २) VBD कार्ड असलेली व्यक्ती यांना राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद,नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार व्यक्ती/रुग्णास रक्त पुरवठा मोफत करण्यांत येईल.<br>या प्रमाणे दराची मा.प्रशासक स्थायी समिती ठराव क्रमांक १७ दिनांक ०८/०१/२०२४ अन्वये केलेल्या शिफारशीस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१४** **विषय क्रमांक - १४**

दिनांक : १६/०२/२०२४ विभाग : अग्निशमन विभाग

<table>
<tr><td>विषय क्रमांक - १४<br>दिनांक<br>१६/०२/२०२४</td><td>अहमदनगर महानगरपालिका सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षापासुन पुरविण्यांत येणा-या अग्निशमन सेवामध्ये फी वाढ करणे बाबत</td></tr>
<tr><td>ठराव क्रमांक - १४<br>दिनांक<br>१६/०२/२०२४</td><td>वरिल विषयांकीत अहमदनगर महानगरपालिका कार्य क्षेत्रामध्ये अग्निशमन सेवा बळकटीकरण करणे साठी तसेच अग्निशमन सेवेतील तुट भरुन काढणेसाठी अत्याधुनिक साधन सामग्री उपकरणे व काही प्रमाणात अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविण्यासाठी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षापासुन अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये व क्षेत्राबाहेर पुरविण्यांत येणा-या विविध प्रकारच्या अग्निशमन सेवांचे दर खालील प्रमाणे.
<table>
<tr><th rowspan="2">अ.क्रं.</th><th rowspan="2">सेवेचे नांव</th><th colspan="2">महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये</th><th colspan="2">महानगरपालिका कार्यक्षेत्रा बाहेर</th></tr>
<tr><th>जुने दर</th><th>प्रस्तावित नविन दर</th><th>जुने दर</th><th>प्रस्तावित नविन दर</th></tr>
<tr><td>०१</td><td>ना-हरकत दाखला फी</td><td>रु.१५००/-</td><td>रु.२०००/-</td><td>रु.१५००/-</td><td>रु.३०००/-</td></tr>
<tr><td>०२</td><td>नुतनीकरण दाखला फी</td><td>रु.५००/-</td><td>रु.२०००/-</td><td>रु.१०००/-</td><td>रु.३०००/-</td></tr>
<tr><td>०३</td><td>स्टॅण्ड बाय डयुटी फी</td><td>रु.३०००/- (१ ते २४ तासांकरीता)</td><td>रु.८०००/- (१ ते २४ तासांकरीता)</td><td>रु.४०००/- (सुरुवातीचे १ ते ८ तासांकरीता)</td><td>रु.१००००/- (सुरुवातीचे १ ते १२ तासांकरीता) पुढील रुपये ५००/- तासाप्रमाणे</td></tr>
<tr><td>०४</td><td>आग विझविणे दाखला फी</td><td>रु.५००/-</td><td>रु.१०००/-</td><td>रु.१०००/-</td><td>रु.२०००/-</td></tr>
<tr><td>०५</td><td>फायर कॉल चार्जेस</td><td>--</td><td>--</td><td>रु.४०००/- (सुरुवातीचे १ ते ८ तासांकरीता)</td><td>रु.१०,०००/- (सुरुवातीचे १ ते १२ तासांकरीता) पुढील रुपये ५००/- तासाप्रमाणे</td></tr>
</table>
अग्निशमन विभागाने सेवांबाबत वरील प्रस्तावित केल्यानुसार दरवाढ करणेस स्थायी समिती प्रशासक ठराव क्रं.२९ दिनांक १५/०२/२०२४ अन्वये केलेल्या शिफारशीस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१५** **विषय क्रमांक - १५**

दिनांक : १६/०२/२०२४ विभाग : रेकॉर्ड विभाग

<table>
<tr><td>विषय क्रमांक - १५<br>दिनांक<br>१६/०२/२०२४</td><td>अहमदनगर महानगरपालिका रेकॉर्ड विभागाकडील नकला फी दरामध्ये वाढ करणे बाबत...</td></tr>
<tr><td>ठराव क्रमांक - १५<br>दिनांक<br>१६/०२/२०२४</td><td>वरिल विषयांकीत रेकॉर्ड विभागाकडील नकला फी दरामध्ये ठ.नं.२ (७) दि.२६/०२/२००२ अन्वये फी दरात वाढ करण्यांत आली होती. तद्नंतर सदरची दरवाढ ही २२ वर्षांनी करण्यांत येत आहे.<br>सद्यस्थितीत कागद, शाई, छपाई, स्टेशनरीचे भावामध्ये वाढ झालेली असल्याने व महागाई वाढीमुळे कामगारांच्या पगारातही वाढ झाली असल्यामुळे चालू फी दरामध्ये जंबो झेरॉक्स प्रती रु.६०/- ते रु.७०/- इतका खर्च येत असल्याने खालील तक्त्याप्रमाणे दरवाढ करणेस मान्यता मिळणेस विनंती आहे.
<table>
<tr><th>अ.नं.</th><th>तपशील</th><th>सध्याचे दर</th><th>नविन दर</th></tr>
<tr><td>०१</td><td>जनरल बोर्ड, स्थायी समिती, बांधकाम परवानगी व इतर सर्व प्रकारच्या ठराव नकला झेरॉक्स सर्टिफाईड नकला फी</td><td>न.पा.ठ.नं.२ (७)दि.२६/०२/२००२ अन्वये दर रु.४०/-</td><td>नविन प्रस्तावित दर रु.२००/-</td></tr>
<tr><td>०२</td><td>प्रत्येक वर्षासाठी शोधासाठी शोधणावळ फी</td><td>न.पा.ठ.नं.२ (७)दि.२६/०२/२००२ अन्वये दर रु.४०/-</td><td>नविन प्रस्तावित दर रु.२००/-</td></tr>
</table>
सर्व नकला अर्जंट (३ दिवसात) देण्यासाठी फी दर दुप्पट आकारण्यांत येतील. यास स्थायी समिती प्रशासक ठराव क्रं.२९ दिनांक १५/०२/२०२४ अन्वये केलेल्या शिफारशीस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.</td></tr>
</table>

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१६** — **विषय क्रमांक - १६**

दिनांक : १६/०२/२०२४ — विभाग : प्रभाग समिती क्रं.१

<table>
<tr><td>विषय क्रमांक - १६<br>दिनांक<br>१६/०२/२०२४</td><td>अहमदनगर महानगरपालिका सावेडी प्रभाग समिती क्रमांक -०१ विभागा अंतर्गत सन २०२४-२०२५ पासून सावेडी जॉगींग पार्क भाडेने देणेचे कर व दरवाढ करणे बाबत...</td></tr>
<tr><td>ठराव क्रमांक - १६<br>दिनांक<br>१६/०२/२०२४</td><td>वरिल विषयांकीत अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक -०१ सावेडी या विभागाकडून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने विभागाकडील सावेडी जॉगिंग पार्क मनपा ठराव क्रमांक १७ दिनांक १४/०८/२०१९ अन्वये फक्त सांस्कृतिक कामाकरीता भाडेने देणे बाबत सेवा देणेत येतात. महानगरपालिकेकडुन पुर्वी एका दिवसासाठी जॉगींग पार्क भाडेने देणेकरीता आकारण्यांत येणारे दर खालील प्रमाणे.
<table>
<tr><th>अ.क्रं.</th><th>आकारण्यांत येणारे भाडे</th><th>जी.एस.टी.</th><th>एकुण रक्कम</th></tr>
<tr><td>०१</td><td>२,०००/-</td><td>१८%</td><td>२,३६०/-</td></tr>
</table>
तसेच सावेडी जॉगींग पार्क एक दिवसासाठी भाडेने देणेकरीता आकारण्यांत येणारे नविन दर खालील प्रमाणे.
<table>
<tr><th>अ.क्रं.</th><th>आकारण्यांत येणारे भाडे</th><th>जी.एस.टी.</th><th>एकुण रक्कम</th></tr>
<tr><td>०१</td><td>१०,०००/-</td><td>१८%</td><td>११,८००/-</td></tr>
</table>
वरिल प्रमाणे प्रभाग समिती क्रमांक -१ सावेडी विभागाने प्रस्तावित केलेनुसार दर वाढ करणेस स्थायी समिती प्रशासक ठराव क्रं.२९ दिनांक १५/०२/२०२४ अन्वये केलेल्या शिफारशीस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.</td></tr>
</table>

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१७** **विषय क्रमांक - १७**

दिनांक : १६/०२/२०२४ विभाग : घनकचरा व्यवस्थापन विभाग

<table>
<tr><td>विषय क्रमांक - १७<br>दिनांक<br>१६/०२/२०२४</td><td>अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग दंडात्मक रकमेमध्ये वाढ करणे बाबत...</td></tr>
<tr><td>ठराव क्रमांक - १७<br>दिनांक<br>१६/०२/२०२४</td><td>वरिल विषयांकीत अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी प्रस्तावित केल्यानुसार दंडात्मक तरतूदीमध्ये वाढ केल्यास मनपाच्या उत्पन्नात वाढ होवून मनपाच्या वाहनांकरीता इंधन व देखभाल दुरुस्तीचा खर्च करणे सोईचे होईल तसेच शहरामध्ये रहदारीस अडथळा होणार नाही तसेच सेप्टीक टँक उपसा करणा-या वाहन व चालक व मालक यांचेवर नियंत्रण टठेवणे सोईचे होईल नागरिकांच्या तक्रारी येणार नाहीत.
<table>
<tr><th>अ.नं.</th><th>गुन्ह्याचे स्वरुप</th><th>पुर्वीची दंडाची रक्कम</th><th>प्रस्तावित दंडाची रक्कम</th></tr>
<tr><td>०१</td><td>मनपा हद्दीमध्ये सार्वजनिक ठिकाणी बांधकाम व पाडकाम मटेरियल टाकणे</td><td>१०,०००/-</td><td>१०,०००/- तसेच प्रति ब्रास रक्कम रु.६००/- प्रमाणे</td></tr>
<tr><td>०२</td><td>खाजगी सेप्टीक टँक उपसा करणारी वाहने</td><td>--</td><td>मनपा मध्ये वाहनांची नोंदणी करणे रु.१/- मनपास रॉयल्टी रक्कम रु.५००/- प्रति खेप तसेच मनपाच्या एफ.एस.टी.पी. प्रकल्पा व्यतिरीक्त इतर ठिकाणी ओढे, नाले इत्यादीमध्ये वाहने खाली केल्यास रु.१०,०००/- दंड</td></tr>
</table>
वरिल प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रस्तावित केलेनुसार दरवाढ करणेस स्थायी समिती प्रशासक ठराव क्रं.२९ दिनांक १५/०२/२०२४ अन्वये केलेल्या शिफारशीस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.</td></tr>
</table>

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१८** **विषय क्रमांक - १८**

दिनांक : १६/०२/२०२४ विभाग : घनकचरा व्यवस्थापन विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - १८ दिनांक १६/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग दंडात्मक रक्कमेमध्ये वाढ करणेबाबत... |

ठराव क्रमांक - १८ दिनांक १६/०२/२०२४

वरिल विषयांकीत अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग सर्व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार दंडात्मक दरामध्ये वाढ करणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

| **अ.क्रं.** | **गुन्ह्याचे स्वरुप** | **पुर्वीची दंडाची रक्कम** | **प्रस्तावित दंडाची रक्कम** |
|---|---|---|---|
| ०१ | लघुशंका | रु.१००/- | रु.२००/- |
| ०२ | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | रु.५०/- | रु.१००/- |
| ०३ | उघडयावर शौचास बसणे | रु.१००/- | रु.५००/- |
| ०४ | उघडयावर कचरा टाकणे | रु.१५०/- | रु.३००/- |
| ०५ | रस्त्यावर पाणी सोडणे | -- | रु.२००/- |
| ०६ | बायोमेडीकल वेस्ट | रु.५०००/- | रु.१०,०००/- |
| ०७ | कचरा विलगीकरण न करणे | -- | रु.५०/- |
| ०८ | डस्टबीन न ठेवणे | -- | रु.५०/- |

तसेच घनकचरा वाहतुक विभाग यांचेमार्फत देण्यांत येणा-या सेवांबाबत दर वाढ करणेकामी खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | सेवेचा प्रकार | मनपा हद्दीमध्ये | हद्दीबाहेर |
|---|---|---|---|
| ०१ | सेप्टीक टॅंक उपसणे | रु.४५०/- | -- |
| ०२ | सेप्टीक टॅंक उपसणे | -- | एक टाकी उपसणे रु.९००/- तसेच येण्याजाण्या करीता प्रति किलो मीटर रु.३०/- |
| ०३ | फिरते शौचालय | प्रति दिवस रु.२५०/- | प्रति दिवस रु.५५०/- |

वरिलप्रमाणे दर आकारण्यांत येत असुन सद्यस्थिती पाहता सदरचे दर अत्यंत कमी असुन सदरच्या रक्कमेमध्ये इंधन व देखभाल दुरुस्तीचा खर्च निघत नसल्यामुळे सदरच्या सेवेचे दर खालील प्रमाणे वाढविणे उचित वाटते.

| अ.क्रं. | सेवेचा प्रकार | महानगरपालिका हद्दीमध्ये | महानगरपालिका हद्दीबाहेर |
|---|---|---|---|
| ०१ | सेप्टीक टँक उपसणे | रु.६५०/- | -- |
| ०२ | सेप्टीक टँक उपसणे | -- | एक टाकी उपसणे रु.१,२००/- तसेच येण्याजाण्या करीता प्रति किलो मीटर रु.३५/- |
| ०३ | फिरते शौचालय | प्रति दिवस रु.५००/- | प्रति दिवस रु.७५०/- |

घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार दर वाढ करणेस स्थायी समिती प्रशासक ठराव क्रं.२९ दिनांक १५/०२/२०२४ अन्वये केलेल्या शिफारशीस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४  विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१९** | **विषय क्रमांक - १९**

दिनांक : १६/०२/२०२४ | विभाग : घनकचरा व्यवस्थापन विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - १९<br>दिनांक<br>१६/०२/२०२४ | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत आकारण्यांत येणा-या सेवा शुल्क दरामध्ये वाढ करणे बाबत... |
| ठराव क्रमांक - १९<br>दिनांक<br>१६/०२/२०२४ | वरिल विषयांकीत अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व मालमत्ता, घरे इत्यादीकडील दैनंदिन घनकचरा संकलन व वाहतुक करणेकरीता मा.सर्वसाधारण सभा क्र.०७ दिनांक २९/०७/२००९ विषय क्र.४ अन्वये सेवा शुल्क निश्चित करण्यांत आलेले आहेत. सदर दर निश्चित करुन १३ वर्ष झालेली आहेत. तथापि अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असणा-या मालमत्ता, घरे, आस्था पनांकडून सुधारीत दरानुसार आकारणी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सुधारीत सेवा शुल्क आकारणी दरांचा तक्ता. |

| **अ.क्रं.** | **कचरा उत्पादक** | **सन २००९ मधील दर** | **दुरुस्ती करावयाचे दर** |
|---|---|---|---|
| ०१ | घरगुती | रु.२०/- | रु.४०/- |
| ०२ | व्यावसायिक आस्थापना | रु.१००/- | रु.२००/- |
| ०३ | औद्योगिक | रु.२००/- | रु.५००/- |
| ०४ | उपहारगृहे व हॉटेल | रु.२५०/- | रु.५००/- |
| ०५ | पोल्ट्रीज नर्सिंग होमस | रु.२५०/- | रु.५००/- |
| ०६ | विवाह कार्यालये/मनोरंजन सभागृहे/एकपडदा चित्रपटगृहे | रु.२५०/- | रु.५००/- |
| ०७ | खरेदी केंद्र/बहुपडदा चित्रपटगृहे | रु.२५०/- | रु.१,०००/- |
| | **रुग्णालये** | | |
| ०८ | पन्नास खाटापेक्षा कमी | रु.२५०/- | रु.५००/- |
| ०९ | पन्नास खाटांपेक्षा जास्त | रु.२५०/- | रु.१,०००/- |
| | **संस्था** | | |
| १० | शैक्षधिक संस्था | रु.२५०/- | रु.५००/- |
| ११ | धार्मिक संस्था | रु.२५०/- | रु.५००/- |
| १२ | शासकीय/निमशासकीय कार्यालये | रु.२५०/- | रु.५००/- |
| १३ | फेरीवाले | -- | रु.१००/- |

| | |
|---|---|
| | वरील प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रस्तावित केले नुसार दरवाढ करणेस स्थायी समिती प्रशासक ठराव क्रं.२९ दिनांक १५/०२/२०२४ अन्वये केलेल्या शिफारशीस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.